**माहे ऑक्टोबर  २०२२ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | रायगड | मर्फी डॉबरमॅन | १) पोहवा/८१७ पी.एन.घरत<br>२) पोना/२१३४ ए.एच.पाटील | मुरूड पोलीस ठाणे गु.र.नं. १३८/२०२२ भा. द. वि. कलम ३७९, ४२९, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे कलम ५ (ब), ५ (क), ९, ९ (अ) हा गुन्हा दि.२७/१०/२०२२ रोजी १७-०३ वाजता दाखल असून घटनास्थळावरील संशयीत आरोपीच्या बुटाचा वास श्वान मर्फी यास दिला असता श्वान मर्फी गुन्हयाच्या ठिकाणावरून वास घेत गारंबी धरणाकडे जाणा-या जुन्या रस्त्याकडे धावत निघाला अंदाजे ५० मिटरवर दुसरा बुट मिळाला तिथे पुन्हा वास दिला असता अंदाजे २.५ कि.मी. अंतरावर असलेल्या गारंबी धरणावर आला. पुन्हा वास दिला असता बाहेरील बाजुस असलेल्या मुख्य रस्त्यावर असलेल्या टपरीच्या आजुबाजूला फिरू लागला व टपरीच्या मगाच्या बाजुस असलेल्या जंगल भागाकडे फिरू लागला व टपरीच्या मागच्या बाजूस असलेल्या जंगलाकडे फिरू लागला. संशयीत आरोपीचा जंगल भागात असलेल्या पारगान गावात शोध लागला. अशा प्रकारे संशयीत आरोपीच्या जाण्याचा मार्ग दाखवून आरोपी पकडण्यात यश मिळाले व गुन्हा उघडकीस येण्यास मदत झाली. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | रायगड | ऑस्कर डॉबरमॅन | १) पोहवा/१४४७ एन. पी. माळवी<br>२) पोना/२१३२ एम. बी. निगडे | रसायणी पोलीस ठाणे अ. म. र. नं. ३१/२०२२ सी. आर. पी. सी. १७४ सदरचे मयत दि. १०/१०/२०२२ रोजी १६-५६ वाजता दाखल असून घटनास्थळावरील मिसींग व्यक्तीचे हेल्मेटचा वास श्वान ऑस्कर यास दिला असता श्वान ऑस्कर हा घटनास्थळापासून कच्चा रस्त्याने धावत जावुन नंतर डांबरी रोडने सारसई गावचे हद्दीतील रेल्वे पटरीने धावत जावुन रेल्वे ब्रिजचे अलीकडे थांबुन तेथेच घुटमळू लागला म्हणुन त्यानुसार ब्रीजखाली मिसींग व्यक्तीचा पण्यामध्ये शोध घेतला असता त्याचा मृतदेह मिळून आला. |



अशा प्रकारे माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये श्वान पथकामार्फत प्राणी संरक्षण अधिनियम - १, मयत - १ असे एकुण - २ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.